# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहमदनगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक – २२ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.७१** **विषय क्रमांक -७१**
दिनांक : १७/०९/२०२४ विभाग : बांधकाम विभाग:

**प्रस्तावाचा विषय :-** ई निविदा क्रं. १९७३ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ३१ बधील लक्ष्मीकृपा कॉलनी ते छाया कॉलनी पर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे अनामत रक्कम (एफ.डी.आर.), रोखीने भरलेले तसेच बीलातून कपात झालेल्या व्यपगत रकमा परतावा करणेबाबत.

---*---

**ठराव :-** मे. गुलशन कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांनी केलेल्या कामांचे दोषदायित्व कालावधी संपल्यानंतर अनामत रक्कम परत मिळणेबाबत मागणी केलेली आहे. परंतू सदरची भरून घेण्यात आलेली रक्कम यांस ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असलेने सदरच्या ठेवी व्यपगत ठेवी मध्ये जमा झालेल्या आहेत.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम क्रमांक २९९ अन्वये अनामत रक्कम इत्यादी यांना परत देण्याकरीता मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी महानगरपालिकेकडे मे. गुलशन कंस्ट्रक्शन, अहमदनगर यांची ई निविदा क्रं. १९७३ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ३१ मधील लक्ष्मीकृपा कॉलनी ते छाया कॉलनी पर्यत रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे अनामत रक्कम रू.२६९९०/- अदा करणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देंत आहे.

**निर्णय:-**

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहमदनगर महानगरपालिका,

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहमदनगर.

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २२ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.७२** **विषय क्रमांक -७२**

दिनांक : १७/०९/२०२४ विभाग : आरोग्य विभागः(ना.हि.यो.)

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये व्हेईकल माउंटेड फॉगिंग मशीन द्वारे धूरफवारणीसाठी खाजगी तत्वावर चारचाकी वाहन चालकासह भाडेतत्वावर घेणेबाबतच्या बिल बाबत.

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केलेनुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये डेंग्यु रूग्ण असल्याने नागरी हिवताप योजना मार्फत डासघनता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून मोठया प्रमाणावर व्हेईकल मांउटेड फॉंगींग मशिनद्वारे धुरफवारणी साठी खाजगी तत्वावर चारचाकी वाहन भाडेतत्वावर लावणे कामी दि.२४/१०/२०१७ च्या प्रस्तावास मान्यता घेण्यात येवून शंभु ट्रॅव्हल्स अहमदनगर यांचे मंजुर कोटेशन दर प्रतिदिन रू.१४००/- प्रमाणे भाडयाने लावण्यात येवून एकूण ३० दिवसाचे कामास व खर्चास मान्यता घेण्यात आली आहे.

संबंधित मोहिम दि.०६/११/२०१७ ते दि.१८/१२/२०१७ या कालावधी मध्ये ३० दिवस राबवण्यात आलेले आहे. सदर काम पुर्ण केलेनंतर मंजूर कोटेशन धारक शंभु ट्रॅव्हल्स यांचे दि.०४/०७/२०१८ रोजी रू.२९,४००/- व रू.१२६००/- इतक्या रक्कमेचे बिल प्राप्त झाले आहे.तथापी सदच्या बिल सादर करण्यास विलंब झालेला असून मध्यंतरीच्या काळात करोना १९ साथ रोग आल्याने सदर प्रकरण सादर करण्यास उशिर झालेला आहे. दि. १८-१२-२०२३ रोजी शंभू ट्रव्हल्सचे प्रतिनिधी यांनी पत्र देवून बिल मिळणे बाबत मागणी केलेली आहे. सदर देयक अदा करणेकामी विलंब झाल्याने लेखापरिक्षण विभागाने मा.महासभेची मंजूरी घेणे बाबत अभिप्राय दिलेला आहे.

तरी अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात व्हेईकल माउंटेड मशिनद्वारे दूर फवारणीचे शंभू ट्रव्हल्स अहमदनगर यांचे देयक सादर करण्यास का विलंब झाला याबाबत वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा खुलासा मागवून पुढील कारवाई करण्यात यावी. व्हेईकल माउंटेड मशिनद्वारे दूर फवारणीचे शंभू ट्रव्हल्स अहमदनगर यांचे देयक अदा करणेस मा.प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णयः-**

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहमदनगर महानगरपालिका,

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक – २२ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.७३** **विषय क्रमांक -७३**

दिनांक : १७/०९/२०२४ विभाग : बांधकाम विभाग:

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ प्रस्तावित विकास कामांसाठी निधी मंजूर करणेबाबत.

---*---

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केलेनुसार मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडील पत्र जा.क्र.COlahm- ३००१२(१७)/४६/२०२४ दि.०६/०८/२०२४ नुसार महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) योजना-२०२४-२५ साठी रक्कम रू.१८,६०,१२,९९४/- इतका निधी अनुज्ञय आहे.सदर योजनेतून खाली नमूद कामे प्रस्तावित करणेत येत आहेत.सदर कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.सदर कामे इतर कोणत्याही योजनेतून मंजूर वा प्रस्तावित करण्यात आलेली नाहीत.

सदर योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ३०%मनपा हिश्शाची रक्कम सदर योजनेत वर्ग करणे आवश्यक राहील.याबाबत लेखा विभागास आदेश व्हावेत.त्यानुसार एकुण रक्कम रू.२४,१४,७५,२३५/- च्या मर्यादेत प्रस्ताव सादर करावा लागणार आहे.

| अ.क्र. | कामाचें नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र १ मधील सावेडी स्मशान भुमी विकसीत करणें | २९९८७००१ |
| २ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र १आठरे पाटील पब्लिक स्कुल मधील भिस्तबाग परीसर तपोवन हाडको परिसर नाना चौक परीसर स्नेह नगरी परीसर अष्टविनायक कोलनि परिसरमध्ये ड्रेनेज, रस्ते, ओपन स्पेस व अमिनेटि विकसित करणे | १२२९८७०४ |
| ३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील लिन्क रोड येथील साई नगर परिसरातिल रस्ते विकसित करणे | ९९९६८६० |
| ४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.४ मधिल माउली संकुल ते गंगा ते कलेक्टर ऑफीस ते अष्टविनायक अपार्टमेंट ते पारिजात चौक ते एकवीरा चौक ते तपोवन रोड येथे ११ के.व्हि उच्च दाब वाहिनी व लघुदाब वाहिनी आणि रोहित्र उभारणी करणे बाबत | १२८००००० |

| | | |
|---|---|---|
| ५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.९ दिल्ली गेट ते न्यु आर्ट्स कॉलेज ते अप्पु हत्ती सर्जेपुरा चौक/ पत्रकार चौक ते डि.एस.पी चौका पर्यंत ११ के.व्हि.उच्च दाब वाहिनी व लघुदाब वाहिणी व रोहित्र उभारणी करणेबाबत. | ६७३४००० |
| ६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र. क्र. ११ मधील फरहत हॉटेल ते कानडे मळा ३३ के. व्हि. अती उच्चवाहिनी, ११ के. व्हि. उच्चदाब वाहिनी, लघुदाब वाहिनी व रोहित्र उभारणी करणे बाबत तसेच भूमीगत केबल चे काम करणे बाबत. | ३६००८७४ |
| ७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र. १५ इंडस्ट्रियल इस्टेट ते लिंक रोड, जे.एल.पी अपार्टमेंट पर्यंत ११ के. व्हि. उच्चदाब वाहीनी, लघुदाब वाहिनी व रोहित्र उभारणी करणे बाबत. | ४८००००० |
| ८ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१५ मधील काटवन खंडोबा रोड येथील ११ के. व्हि. उच्च दाब वाहिनी, लघुदाब वाहिनी व रोहित्र उभारणी करणे बाबत. | ४०७८००० |
| ९ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र. १४ मधील सारसनगर आशिवाद कॉलनी, कानडे मळा, येथील अतिउच्च दाब वाहिनी उभी करणे. | ९३३००० |
| १० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र. १६ मधील भूषण नगर माधव नगर, जयहिंद नगर, शिवाजी नगर, रभाजी नगर, मराठा नगर, अंतर्गत रस्ते विकसीत करणे | ९४९९९५८ |
| ११ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र. ५ मध्ये एचडीएफसी बँक ते निकम घर ते बोरा घर ते माडगे घर ते आदर्श कॉलनी अंतर्गत रस्ते विकसीत करणे. | ७२९९०४६ |
| १२ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क ३ मध्ये मरियम नगर अंतर्गत रस्ते काँक्रिटीकरण करणे. | १९९८४८३ |
| १३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र. ८ मध्ये नालेगाव, जगताप मळा, लिंक रोड येथे सर्व्हे नं. ८९/१/२/३/ ओपन स्पेस विकसीत करणे | ७७९६२०४ |
| १४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र. १ मध्ये सेल्स टॅक्स कॉलनी, लाकडे घर ते लिपने घर ते बेडसे घर ते घुले घर आणि दानवे घर ते बोठे घर ते लोंकार घर ते जोशी घर आणि मगर घर ते गुंड घर ते शिंदे घर ते जोधी घर आणि साई चहा सेंटर ते अष्टविनायक इलेक्ट्रीक शॉप आणि वाणी नगर कमान ते कांडेकर घरापर्यंत रस्ते विकसीत करणे. | ७७९६२०४ |
| १५ | प्रभाग क्रं १५ मध्ये सुखकर्ता कॉलनी ते रल्वे ट्रॅक पर्यंत ३०० एम.एम.आर.सी.सी. पाईप गटर करणे. | ८७९४४४ |
| १६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे माळीवाडा सर्व्हे नं.५४/५/२ , ५४/५/१, ५४/५५/१ या मधील महानगरपालिकेच्या मालकीची खुली जागेला संरक्षक भिंत बांधणे. | ३७९४७४६ |
| १७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१सर्व्हे नं.२३/१ ब आयोध्या नगर, येथील ओपन स्पेस विकसीत करणे. | १४९८९५६ |
| १८ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१३ मधील रंगारगल्ली,राधाकृष्ण ते आखाडे घर ते जोशी घर ते राणी टेलर ते वैद्य घर ते हंडारे घर ते बापू भोसले घरापर्यंत ३०० एमएम पाईप गटार व रस्ता कॉर्किटीकरण करणे | १०९९१३३ |

| | | |
|---|---|---|
| १९ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१३ मधील पुणतांबेकर गल्ली अंतर्गत,परदेशी घर ते रत्नपारखी ते मिलिंद जाधव घर ते गणेश डेअरीपर्यंत ३०० एमएम पाईप गटार व रस्ता कॉर्किटीकरण करणे | ९९७५५६ |
| २० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१ मधील आठरे पाटील स्कुल जवळ कांदेकर घर ते कंधारे घर ते संजय क्षिरसागर घर ते खांडके घर ते निल रो बंगलो स्कीमपर्यंत रस्ता कॉक्रिटीकरण करणे | ९९८१८३ |
| २१ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१ मधील शिवनेरी नगर अंतर्गत तनपुरे बंगला ते त्रिभुवन घर ते राणा घर ते कुलकर्णी घर ते कुलकर्णी घर ते पंधारे घर ते गुंजाळ घरापर्यत कॉक्रिटीकरण करणे | ९९७३१३ |
| २२ | प्र.क्र.०१ मध्ये भिस्तबाग चौक,छत्रपती कॉलनी अंतर्गत ३०० एमएम एन.पी.२ आर.सी.सी. पाईप गटर करणे | ९९९७०६ |
| २३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.११ मधील सुभेदार गल्ली येथील अंतर्गत आर.सी.सी.गटर करणे व बाबु कुरेशी घर ते आर.आर.बेकरी ते अलीम कुरेशी घर ते जावेद बागवान ते कादरी घरापर्यत आर.सी.सी.गटर करणे | २४९८१६८/- |
| २४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१५ मधील साईराम नगर येथील पगारे घर ते देवढे घर ते शेळके घर ते ठाणगे घर ते येरकर घरापर्यत मजबुती करण व डांबरीकरण करणे. | ३३९८५३८/- |
| २५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१५ मधील कैलास घर ते सी.एम.हाईटस् आणि बोरोटे घर,लबडे घर आणि शिंदे घर ते ललगे घर ते नवले घर ते शिरसाठ घर आणि चांदणे घर ते केदारे घर ते सचिन हरबा घर आणि शेख घर ते घुले घर ते डॉ.सुर्यवंशी घर ते म्हसोबा मंदिर आणि डहाळे घर ते गटणे घर ते धाडगे घर आणि गोरे सर घर ते जगताप घर ते आगरवाल घर रस्ते विकसित करणे | ४४९८५६२/- |
| २६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१ मधील मध्ये देवपुजा कॉलनी ओपनस्पेस मध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणे व सुशोभिकरण करणे | ९९९१७९/- |
| २७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.०२ मध्ये समर्थ नगर भागात गर्जे मेजर घर ते धकाते घर कॉक्रीटीरण करणे व ओपनस्पेस सुशोभिकरण करणे | १४९९५०१/- |
| २८ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१ मध्ये लेखानगर बोरूडेघर ते भिंगारदिवे प्लॉट परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | ९९९९७०/- |
| २९ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१ मध्ये जयमल्हारपार्क अंतर्गत दिवटे घर ते गुंजाळ घर ते काळे घर ते महाजन घर अंतर्गत रस्ता विकसित करणे | १९९९९३०/- |
| ३० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१३ मधील नाथ मंदिर ते नाना पाटील वस्ताद तालीम ते काका मिसळ पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | ३९९८४२१/- |
| ३१ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.०३ मधील इक्रा स्कुल ते रंगरिक घर ते जुनेद शेख घर ते दत्त मंदिर ते फैज घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | १९९९०१२/- |
| ३२ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.०९ मधील दादासाहेब रूपवते विद्यालय ते सिध्दी बाग प्रवेशव्दार पर्यत रस्ता डांबरीकरण करणे. | १९९६६६५/- |

| | | |
|---|---|---|
| ३३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.११ मधील जुने कलेक्टर ऑफिस ते डॉ.शेलार घरपर्यंत आर सी सी गटर करणे | २१९८४६३/- |
| ३४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.०७ मधील अंकुर कॉलनी व व्यंकटेश कॉलनी अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | ४२९८९२३/- |
| ३५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.०७मध्ये माताजी नगर येथे अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे | ३२९९५७९/- |
| ३६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१४ मधील साई आनंद अपार्टमेंट येथील ओपनस्पेस विकसित करणे | १६९३६४६/- |
| ३७ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.०७ मधील आदर्श नगर येथील सिना भवन ते आंबेडकर चौक आणि परिसरपर्यंत ६०० एम एम बंदपाईप गटर करणे | २७९६०८९/- |
| ३८ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.५ मधील बिशप लॉईड कॉलनी येथील अंतर्गत रस्ते विकसित करणे | ४२९९५४४/- |
| ३९ | प्र.क्र.१४ मधील सारसनगर येथे सर्व्हे नं.४९ /२अ /ए मध्ये ओपनस्पेस विकसित करणे | ३८२८५७६/- |
| ४० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१५मध्ये इंडस्ट्रीयल इस्टेट येथील पाण्याची टाकी ते इंगळे वस्ती ते पंचशिल वाडी परिसरामध्ये पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे | २७०६१५९/- |
| ४१ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१४ मधील रेणुकानगर येथील ओपनस्पेस विकसित करणे | १९९४३५१/- |
| ४२ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.०७ मधील व्यंकटेश कॉलनी अंतर्गत रस्ते विकसित करणे | १९९८४८३/- |
| ४३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.०७ मधील गुंदेचा कॉलनी मधील शनी मारूती मंदिर परिसर कॉक्रीटीकरण करणे | १९९८४८३/- |
| ४४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्र.क्र.१५ मधील सुयोग पार्क रेणुका अपार्टमेंट ते भोजने घर रस्ता कॉक्रीटीकरण करणे | ९९९१३८/- |
| ४५ | प्र.क्र.०४ मधील सिव्हील हडको मधिल ढुमणे घर ते सैंदाणे घर व हजारे घर ते मोरेघर व धनवटे घर ते मुथीयान घर व संतोषी माता मंदिर ते विर घर,भारत चौक ते कंठाळे घर ,लोखंडे घर ते गायकवाड घर ,जज्जर घर ते बरकसे घर ,देवणे ते शेख घर व तुळजाभवानी परिसरात रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | ११९५४९३०/- |
| ४६ | प्र.क्र.०५ मधील १.जॉगींग ट्रॅक २.प्रोफेसार कॉलनी,गणेश चौक ,हडको ३.हडको स्टॉप ४.प्रोफेसर कॉलनी चौक ५. टि.व्ही.सेंटर चौक येथे ९ मीटर सोलर हायमास्ट उभारणे | ३१३३३७०/- |
| ४७ | प्र.क्र.०४ मधील मॉडेल कॉलनी अंतर्गत ९०० एम एम एन पी २ आर सी सी पाईप गटर करणे | १८९५८९२/- |
| ४८ | प्र.क्र.१५ मधील श्री सचिन भुतारे घर ते आगारकर घर व दराडे घर ते उकांडे घर व हनुमान मंदिर परिसर येथे ३०० एम एम एन पी २ आर सी सी पाईप गटर करणे | ७४९८५३/- |

| | | |
|---|---|---|
| ४९ | प्र.क्र.१६ मधील लिंक रोड अंतर्गत सदगुरू टॉवर ते घुले वखार व भुषन नगर अंतर्गत गायके घर ते चारू घर ,नम्रता कॉलनी अंतर्गत गांगर्डे घर ते कवडे घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | १९९९९२८/- |
| ५० | प्र.क्र.८ मधील पाटिल किराणा ते बुचके घर ते शिंदे घर ते भिंगारदिवे घर ते अनभुले घर व परिसरात रस्ता विकसीत करणे | २२४८०४७/- |
| ५१ | प्र.क्र.१२ आमनपाटील रोड येथे ४५० एम.एम.एन पी २ क्लास आर सी सी पाईप गटर करणे | ११२५२५१/- |
| ५२ | अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत परिसरामध्ये रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | १३९२६८४/- |
| ५३ | प्र.क्र.१६ केडगांव येथे लाला नगर अंतर्गत ३०० एम एम एन पी २ क्लास आर सी सी पाईप गटर करणे | ९९८९८१/- |
| ५४ | आनंदधाम पासुन कृष्णाई बंगल्यापर्यत पावसाळी गटर करणे | ४७३४४६/- |
| ५५ | प्र.क्र.१६ मध्ये स.नं.५०१/४,ओंमकार नगर येथे गाडे घर ते पवार घरापर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | ९८७२०८/- |
| ५६ | प्र.क्र.८ मधील नालेगांव स.नं.२४३,२४४ मधुन जाणारा डिपी रस्ता विकसित करणे | ५५९६२०७/- |
| ५७ | प्र.क्र११ मधील हातमपुरा येथे बहार जनरेटर ते इसाक बापु घर ते प्रेशर पंपापर्यत रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | १०६४०४९/- |
| ५८ | प्र.क्र.११ मधील किंग्ज गेट कारंजा ते सोपनराव वडेवाले ते इदगाह दर्गा पर्यत आर सी सी पाईप गटर व रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे | १५९९३९९/- |
| ५९ | प्र.क्र.६ मधील देना अर्बन कॉलनीतील ओपनस्पेस विकसीत करणे | ९९९५४८/- |
| ६० | प्र.क्र.६ मधील देना अर्बन कॉलनीतील लांडे घर ते कर्डीले घर ते देशमुख घर ते पटेल घरापर्यत बंद पाईप गटर करणे . | ९९९७५४/- |
| ६१ | प्र.क्र.६ मधील भारत कॉलनी येथील बुरगुल घर ते आनंद घरापर्यत चा रस्ता कॉक्रीटीकरण करणे | ९९९६७०/- |
| ६२ | प्र.क्र.६ मधील श्रीनाथ कॉलनी येथील ओपनस्पेस विकसीत करणे | ९९९५५४/- |
| ६३ | प्र.क्र.६ मधील सिध्दीविनायक कॉलनी येथील भागवत घराशेजारील ओपनस्पेस विकसीत करणे | १४९९९६०/- |
| ६४ | प्र.क्र.६ मधील आरोळे कॉम्प्लेक्स येथील येवले घरासमोरील ओपनस्पेस विकसीत करणे व समर्थ कॉलनी ओपनस्पेसमध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे | ९९९३०५/- |
| ६५ | प्र.क्र.६ मधील भिडे चौक सुशोभिकरण करणे | ९९९४३८/- |
| ६६ | प्र.क्र.६ मधील रासनेनगर चौक सुशोभिकरण करणे | ९९९२३०/- |
| ६७ | प्र.क्र.६ मधील पार्वती नगर येथील ओपनस्पेस विकसीत करणे व रस्ते विकसीत करणे | १९९९२३५/- |
| ६८ | प्र.क्र.६ मधील अमित बॅक कॉलनीतील सावन छाब्र घर ते शेखर जोशी घरापर्यत रस्ता कॉक्रिटीकरण करणे | १९०५४१५/- |
| ६९ | प्र.क्र.१५ मधील पठाण घर ते काळोखे घर ते सिना नदी पर्यत ३०० एम एम एन पी २ आर सी सी पाईप गटर करणे | ९९८५०५/- |

| | | |
|---|---|---|
| ७० | प्र.क्र.१० मध्ये राज चेंबर ते कोंडयामामा चौक कोठला परिसरात नाझीरभाई गॅरेज ते हुसेनी बेकरी तसेच अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे | ९९९६४२९/- |

तरी उक्त नमुद विकास कामाचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) २०२४-२५ अंतर्गत रक्कम रू.२४,१४,७५,२३५/- (अक्षरी रक्कम रू.चोवीस कोटी चौदा लाख पंचाहत्तर हजार दोनशे पस्तीस मात्र) खर्चाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर (न.पा.) यांचेकडेस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेकामी मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

**निर्णयः-**

महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहमदनगर महानगरपालिका,

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर

## नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहमदनगर.


**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २२ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.७४** **विषय क्रमांक -७४**

दिनांक : १७/०९/२०२४ **विभाग**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहरालगत मौजे पिंपळगाव माळवी ता.नगर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा भव्य पुतळा व महिला सक्षमीकरण केंद्र (Wolmen Empowerment Center) अंतर्गत विविध विकास कामे करणेसाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत.

---*---

**ठराव :-** पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचा जन्म अहमदनगर जिल्यातील असल्याने जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी / परिसरामध्ये अहमदनगर शहरालगत अंतरराष्ट्रीय स्तरावरील "Statue of Women Empowerment" उभारणे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचा भव्य पुतळा देशभरात त्यांनी केलेल्या विविध कामांच्या प्रतिकृती व महिला सक्षमीकरण केंद्र इत्यादी कामांचा समावेश असणार आहे. सदर प्रकल्पाकरीता अहमदनगर शहरालगत मौजे पिंपळगांव माळवी, ता.नगर येथील अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीची जागा सर्व दृष्टने संयुक्तीक आहे. या प्रकल्पाकरीता निर्विवाद ३० एकर जागा उपलब्ध करून देणेबाबत मा.ना.डॉ.राधाकृष्ण विखे पाटील मंत्री, महसुल, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य यांनी पत्र देवून मागणी केली. तथापी सदर जागा उपलब्ध करून देण्या ऐवजी प्रकल्प विकसीत करण्यासाठी अहमदनगर महानगरपालिका व जिल्हा नियोजन यांच्या सहभागी तत्वावर प्रकल्प राबविणे संयुक्तीक वाटते.

सदर प्रकल्प अहमदनगर महानगरपालिका व जिल्हा नियोजन अहमदनगर यांच्या सहभागी तत्वावर करता येईल यासाठी मा.शासनाकडून, जिल्हा नियोजन समिती , अहमदनगर यांच्याकडून निधी उपलब्ध होण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात यावा.यास मा.प्रशासन सर्वसाधारण सभा मंजुरी देणेत येत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ २०२३/प्र.क्र.४३१/ नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वयेप्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | मा.प्रशासक, |
| अहमदनगर महानगरपालिका, | अहमदनगर महानगरपालिका, |